# महासुरक्षा पत्रिका

## राष्ट्रीय सुरक्षा परिषद

महाराष्ट्र चॅप्टर

NATIONAL SAFETY COUNCIL

MAHARASHTRA CHAPTER

मुखपत्र




संपादक
श्री. द. ल. मस्कीकर

वर्ष २ रे अंक ५ वा | जुलै - सप्टेंबर २००९ | सभासदांसाठी विनामूल्य


## राष्ट्रीय सुरक्षा परिषद

### महाराष्ट्र चॅप्टरच्या वतीने

### दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



**ही दिपावली सर्वांना सुखाची, समृद्धीची आणि सुरक्षिततेची जावो.**

## अध्यक्षांचे मनोगत



मित्रांनो,

ह्या वेळेच्या "मनोगतामधून" आपल्याशी दोन-तीन हिताच्या गोष्टी बोलाव्याशा वाटतात.

या वर्षी जगातील सर्व राष्ट्रांना "आर्थिक मंदी", "उष्म्याची तेजी" व नंतर अतीवृष्टी अशा तिहेरी पेच प्रसंगांना तोंड देत वाटचाल करावी लागत आहे.

जगातील बहुसंख्य राष्ट्रे आर्थिक मंदीतून बाहेर पडण्यास धडपडत असून त्यातील काही राष्ट्रांना त्यांच्या प्रयत्नात यश देखील नजरेस येऊ लागले आहे.

महत्वाची बाब म्हणजे आपला देश सुध्दा या धडपडीत मागे नाही. आपल्या उत्पादन क्षेत्राचा मागोवा घेतल्यास मी जे सांगतो आहे त्याची सत्यता पटेल. अशा परिस्थितीत एक अवधान मात्र बाळगावेच लागेल, उत्पादनाची प्रगती गाठतांना सुरक्षिततेची हेळसांड होणार नाही याचे अवधान आपण ठेऊया! सामान्यत: अधिकाधिक उत्पादन कार्याच्या उत्साहापोटी निष्काळजीपणा वाढून अपघात वाढू शकतात.

अखेर, आर्थिक प्रगती पूर्वस्थितीवर आणण्यासाठी होणाऱ्या औद्योगिक जगाच्या प्रयत्नांना खीळ घालण्याचे काम पावसाची अवकृपा व "स्वाईन फ्लू" यांनी केले हे सुध्दा येथे नमूद करतो. अर्थात बारकाईने विचार केल्यास ह्या वर्षी आलेल्या या आपत्ती वातावरणातील झालेल्या व होत असलेल्या अनिष्ट बदलांमुळे आहेत हे आपणास पटेल. आपल्या भारतात सर्वोच्च पर्जन्यमान असणाऱ्या चेरापुंजी सारख्या ठिकाणी लोकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागते हे वाढत्या उष्म्यामुळे होणाऱ्या हवामानातील बदलाचे बोलके उदाहरण आहे. वाढत्या उष्म्याच्या काही कारणांपैकी प्रमुख कारण स्त्रोत/उगम म्हणून कारखान्यांकडे बोट दाखविले जाते. अमेरिका आणि इतर औद्योगिक दृष्ट्या प्रगत राष्ट्रे सांगताहेत की, वाढत्या उष्म्याला व वातावरणातील अनिष्ट बदलांना आळा घालण्यासाठी सर्वच औद्योगिक राष्ट्रांनी ग्रीन-हाऊस वायूंच्या प्रभावी नियंत्रणासाठी "एमिशन कॅप" म्हणजे "उत्सर्जनाला आवर" या औद्योगिक नीतीचा अवलंब करावा. आता, या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित होतात. जगभर होत असलेल्या ग्रीन हाऊस गॅस उत्सर्जनात सर्व औद्योगिक प्रगत राष्ट्रांचा "सिंहाचा वाटा" आहे तर भारत व भारतासारख्या इतर विकसनशील देशांचा "खारीचा वाटा आहे" ही तज्ञांनी सिध्द केलेली जगप्रसिध्द वस्तुस्थिती आहे. शिवाय "ग्रीन हाऊस कॅप" मुळे विकसनशील राष्ट्रात औद्योगिक व आर्थिक परिस्थिती डबघाईला येऊन त्यातून गरिबी व बेकारी सारख्या गंभीर समस्या निर्माण होणार नाहीत याचीही काळजी घ्यावी लागेल. ही समस्या येत्या डिसेंबर मध्ये कोपन हेगन येथे होणाऱ्या परिषदेत चर्चेला येईलच, तेव्हा "ग्रीन हाऊस गॅस एमिशन कॅप" ही दारिद्र्य व बेकारी दूर करणाऱ्या कार्यक्रमाची "कॅप" बनणार नाही असा व्यवहार्य विचारविनिमय व निर्णय या परिषदेत व्हावा या दृष्टीने सर्व प्रगतीशील राष्ट्रांनी जागृत व प्रयत्नशील रहायला हवे. ऑक्टोबर ते डिसेंबर हा सणासुदीचा कालावधी. दसरा, दिवाळी, ख्रिसमस या निमित्ताने सर्वानाच आपला आनंद व्यक्त करावसा वाटतो. परंतु आपल्या आनंद व्यक्त करण्याच्या पध्दतीत बदल व्हायला नको का? फटाक्यांनी होणारे अवास्तव ध्वनी प्रदूषण व वायू प्रदूषण हा सुध्दा चिंतेचा विषय आहे. ऊर्जा जपणुकीच्या सद्यस्थितीत भरमसाठ रोशनाई कितपत योग्य ठरते? ह्या शिवाय सदर कालावधीत होणाऱ्या बेकाबू दारूकामामुळे लागणाऱ्या आगीचा धोका कसा नजरेआड करता येईल? त्या ऐवजी आकाशात उंचावर होणारी शोभेची आतषबाजी करायला काय हरकत आहे? आणि परिचितांच्या, स्नेहांच्या, आप्तस्वकीयांच्या गाठी-भेटी घेऊन व एकमेकांची तोंडे-गोड करून आणि दर्जेदार मासिकांचे खास विशेषांक वाचून निदान आपण मोठ्या व जाणकार व्यक्तींनी या सणांचा आनंद व्यक्त करायचा पायंडा पाडूया म्हणजे बाळगोपाळ मंडळी हि निश्चित याचा विचार करू लागतील व सण-सुरक्षितता हा वेगळाच अध्याय आपण जनतेपुढे ठेऊ शकू. खालील घोषणा लक्षात ठेवा.

"ज्याचे जागृत मन त्याच्या आनंदात सण"

**अरविंद रा. दोशी**
अध्यक्ष, राष्ट्रीय सुरक्षा परिषद, महाराष्ट्र चॅप्टर

# क्लोरिन वायु हाताळण्यातली सुरक्षितता

**१) वाहतुक**

● क्लोरिन भरुन देणाऱ्या कंपनीने क्लोरिन वाहतुक करणारा ड्रायव्हर पूर्ण प्रशिक्षित असल्याची खात्री केली पाहिजे.

● क्लोरिन वाहक ट्रक वाहतुकीच्या दृष्टीने मजबूत असला पाहिजे. त्यावर सर्व सुरक्षा उपकरणे असल्याची खात्री केली पाहीजे. ट्रकवर हाजकेमचा बोर्ड असला पाहीजे.

● ड्रायव्हरजवळ ट्रेमकार्ड देण्याची तसेच त्याविषयी त्याला प्रशिक्षित करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

● ड्रायव्हरने त्याला नेमून दिलेल्या रुटनेच वाहतुक केली पाहीजे व ट्रेमकार्ड सहित इतर संबधीत महत्वाची कागदपत्रे व्यवस्थीत ठेवली पाहीजे, जेणेकरुन गरज पडल्यास अधिकाऱ्यांस ती दाखविता येतील.

● ट्रकमध्ये इतर रसायने, माल, माणसे यासंबधीची वाहतुक करु नये. वेग मर्यादा पाळावी. वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. sudden braking टाळावे.

● सर्व कंटेनर्स किंवा सिलेंडर्स व्यवस्थीत एका लेयरमध्ये एकमेकांपासून योग्य अंतरावर स्वतंत्र ओटी (आधार) लावलेले असावे, जेणेकरुन ते एकमेकांवर आदळणार नाही.

● सर्व कंटेनर्स व्हाल्व सरळ उभ्या स्थितीत येतील असे लावावेत.

● रस्त्यात वाहतुकीमध्ये क्लोरिन वायूची गळती झाल्यास ट्रक न थांबविता दूर मोकळ्या ठीकाणी न्यावा व गळती शक्यतो आटोक्यात आणून संबधीतांना संपर्क करावा.

**२) स्टोरेज एरिया**

● क्लोरिन कंटेनर्स स्टोरेज एरिया थंड, कोरडा व हवेशीर असावा. त्याच्या आसपास उष्णतेचे स्त्रोत नसावेत. कंटेनर्स ओल्या जागेत किंवा चिखलात ठेवू नये.

● कंटेनर्स उन्हात ठेवू नयेत. गोदामास एक्झॉस्ट फॅनची सोय असावी व ती जमीनीलगत असावी.

● स्टोरेज एरियाच्या इमारतीवर दिशादर्शक झेंडा असावा.

● स्टोरेज एरिया व सर्विस एरियाजवळ न्युट्रलायझेशन सिस्टम असावी. continous leakage monitoring साठी उपकरणे असावीत.

● बाहेरील किंवा अज्ञात व्यक्तीस स्टोरेज एरियात प्रवेशास बंदी असावी.

● कंटेनर ठेवताना त्याचे व्हाल्व हे सरळ उभ्या रेषेत येतील असेच ठेवावेत व कंटेनर्स सपोर्ट किंवा ठेवण्याची जागा जमीनीपासून कमीतकमी १ फूटापर्यंत उंच असावी जेणेकरुन पाणी वगैरे साचल्यास कंटेनर्स सुरक्षित राहील व ऑपरेटरलाही काम करणे सुलभ होईल.

● कंटेनर्स लोखंडी रेल किंवा टुनियन व्हीलवर ठेवावेत, जेणेकरुन त्याची व्हाल्व पोझीशन सहज फिरवता येईल. कधीही एकावर एक कंटेनर्स ठेवू नयेत.

● सर्व कंटेनर्सला व्हाल्व प्राटेक्शन कॅप नट जोडला असल्याची खात्री कंटेनर्स घेताना व देताना दोन्ही वेळेस करावी.

● Storage Area मध्ये स्फोटके, ॲसीडस् टरपेंन्टाइन, इथर, टोकदार लोखंडी वस्तू व इतर ज्वालाग्रही पदार्थ ठेवू नयेत.

● भरलेले / रिकामे कंटेनर्स वेगवेगळे ठेवावेत व तेथे तसे लेबल लावावे. जेवढी काळजी भरलेल्या कंटेनर्सची घ्याल तेवढीच काळजी रिकाम्या कंटेनर्सची घेतली पाहीजे.

● कंटेनर्सशी कधीही खेळू नये.

● प्रत्येक शीफ्टमध्ये किमान एकदातरी अमोनिया टॉर्च घेवून storage Area ते service Area ची तपासणी केली पाहीजे, कारण क्लोरिनचा लिकेज आपोआप कधीच बंद होत नाही व नंतर उग्ररुप धारण करु शकतो. हे लक्षात घेवूनच छोट्यातल्या छोट्या लिकेजलाही प्राधान्य द्या.

● लिकेज कंटेनर्सवर कधीही पाणी मारु नये. कंटेनर्स रिकामा असला तरी त्यावर वेल्डींग करु नका.

● कंटेनर्सची चढउतार करताना वैयक्तीक सुरक्षा उपकरणे परिधान केली पाहीजेत. तसेच mechanical / electrical hoist चा वापर केला पाहीजे. EOT ची सोय नसेल तर रॅम्पची तरी सोय असली पाहीजे. म्हणजे कंटेनर्सची आदळआपट थांबेल. चढउतार करताना लिफ्टींग मॅग्नेटचा वापर करु नये.

**३) Service / process मध्ये हाताळणी.**

● ज्या क्रमाने कंटेनर आला आहे त्याच क्रमाने त्याचा वापर करा. अन्यथा कंटेनर बराच काळ राहील्यास त्याच्या valve packing hard होवून लिकेजला निमंत्रण मिळू शकते.

● Valve वर कोणतेही lubricant लावू नका.

● योग्य मापाचेच पाने, हत्यारे वापरा. फाजील ताकद लावू नका. एखादा व्हाल्व उघडला नाही तर कंटेनर्स फिरवून दुसरा व्हाल्व उपयोगात आणा. खराब असलेल्या व्हाल्वला गोल वर्तुळ काढून कंपनीकडे पाठविताना त्याची तक्रार करुन त्यांच्या निदर्शनास आणून द्या.

● संपूर्ण क्लोरिनेशन प्लॅन्ट मध्ये मान्यताप्राप्त हत्यारे, वस्तु व यंत्रेच वापरा. क्लोरिनच्या रासायनिक गुणधर्मानुसार त्यांची निवड करा.

● पीवीसी/रबरचा वापर कनेक्शनसाठी कधीही करु नये.

● Connection झाल्यावर त्याची अमोनिया टॉर्चने तपासणी करा. नंतर प्रोसेस सुरु करा.

● कंटेनरचा व्हाल्व हा फक्त पूर्ण उघड किंवा बंद करण्यासाठीच आहे. त्याचा flow controller म्हणून उपयोग करु नका.

● कंटेनर बदलताना श्वसन उपकरण वापरा.

● कंटेनरमधून जास्त रेटने गॅस मिळावा म्हणून कंटेनरला गरम करु नका ते धोक्याचे आहे. तसेच कंटेनरचे प्रेशर ०.१ ते ०.५ एवढे किमान राहील याची काळजी घ्या.

● एखादी प्रोसेस किंवा सर्विस बऱ्याच काळाकरिता बंद राहणार असेल तर त्याचे कंटेनर व्हाल्व बंद करावेत.

● प्रोसेस किंवा सर्विस बंद करताना कंटेनरचे व्हाल्व प्रथम बंद करावेत मगच हेडर लाइनचे व्हाल्व बंद करावेत.

● कंटेनर पूर्ण भरलेला असेल तर तसे त्यावर लिहावे तसेच रिकामा असेल तरीही त्यावर रिकामा असल्याचे तारीख, वेळेसहीत लिहावे.

● फॅक्टरी ॲक्टनुसार सर्व lifting tackles, pressure vessels, containers इ. चे वार्षीक-द्विवार्षिक testing झाले पाहीजे व त्याची नोंद ठेवणे हे आवश्यक आहे.

● क्लोरिनेशन प्लॅन्ट मध्ये काम करणाऱ्या सर्वांनाच संपूर्ण प्रोसेसची माहीती असायलाच हवी तसेच ईमर्जन्सी आपरेशनची देखील माहीती असली पाहीजे. कुठलीही आपत्ती आली तर घाबरुन वा गोंधळून न जाता On site Emergency plan मध्ये ज्या लेखी स्वरुपात कृती आराखडा असेल त्यानुसार वागले पाहीजे. यासाठी नियमित mock drill, traning ची व्यवस्था आपल्या व्यवस्थापनाने करणे आवश्यक आहे.

**श्री. भास्कर स. पाटील**
सहाय्यक अभियंता (रसायने),
भांडूप जलशुध्दीकरण संकुल,
बृहन्मुंबई महानगरपालिका

## एन एस सी - मार्ग है मेरा

जहाँ लोगों के सुरक्षा का
विचार विमर्श हो सांझ सबेरा।

जहाँ सुरक्षा सप्ताह के माध्यम से लोगों में जगाते है चेतना
वो एन एस सी - मार्ग है मेरा।।

जहाँ समुह कार्य के माध्यम से
अडचन सुधारे जाते है जहाँ प्रशिक्षण के माध्यम से।

हर जन सवारे जाते जहाँ सुरक्षा कदम-कदम पर करे बसेरा
वो एन एस सी - मार्ग है मेरा।।

जहाँ पोल्युशन नियंत्रण कर
पर्यावरण करे सुरक्षित।

जहाँ सुरक्षा की टीम हमेशा हर प्लांट में डाले फेरा
वो एन एस सी - मार्ग है मेरा।।

जहाँ अपघात विना
जिवन को सवारा जाता।

हम सबका संकल्प है इतना न्यारा
वो एन एस सी - मार्ग है मेरा।।

राजेश कुमार गोडे
वॉनबरी लिमिटेड-पातालगंगा

# सुरक्षिततेसाठी क्लोरीन वायुसंबंधी माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| हाताळण्यात येणाऱ्या रसायनांचे नांव | क्लोरीन | रासारनिक संज्ञा | $Cl_2$ |
| **भौतिक गुणधर्म** | | | |
| उत्कलन बिंदू | -३४° सें. | वितळण बिंदू | -१०१° सें. |
| द्रवरुप घनता (१० सें. तापमानास) | १.४७ | बाष्प घनता (हवा +१) | २.४९ |
| बाष्प दाब (२० सें. तापमानास, पाऱ्याच्या स्तंभानुसार मि.मि. मध्ये) | | ५.५ कि.ग्रॅ. प्रति से.मी. | |

## इतर वैशिष्टे :

१) हिरवट पिवळ्या रंगाचा गुदमरुन टाकणारा अतिविषारी वायु
२) तीव्र ऑक्सीडीकारक पदार्थ
३) उच्च तापमानास पाणी व लोह यांच्या बरोबर तीव्र स्वरुपाची रासायनिक अभिक्रिया होते.
४) या वायुच्या संपर्कात डोळ्यांची तसेच श्वसन मार्गाची अत्यंत जळजळ होते.
५) ४०-६० पी.पी. एम पर्यंत तीव्रता असलेल्या क्लोीन वायुच्या थोड्या संपर्कानेदेखील अर्ध्या तासात मृत्यु संभवतो.
६) ३.५ पी.पी. एम. तीव्रतेचे प्रमाणास क्लोरीन वास तात्काळ जाणवतो, याचा वास विशिष्ट, नाकास झोंबणारा आहे.
७) १००० पी.पी. एम. तीव्रतेचे प्रमाणास थोड्या अवधीतच मृत्यु संभवतो.
८) पाण्यात विद्राव्य नसून हवेपेक्षा जड आहे.

| धोकादायक | घ्यावयाची काळजी | प्रतिबंधात्मक उपाय |
|---|---|---|
| ज्वलनशील पदार्थ तसेच क्षपनक यांसोबत तीव्र स्वरुपाची अभिक्रिया होऊन आग लागू शकते अथवा स्फोट होऊ शकतो. | आग लागल्यास सभोवताली थंडावा निर्माण करा. | क्लोरीन वायुचा पुरवठा अथवा गळती तात्काळ बंद करावी व भोवतालचे तापमान थंड करण्याकरिता, श्वसन उपकरणांचा वापर करुन पाण्याचा फवारा मारावा. तसेच क्लोरीन कंटेनर्स हलविणे शक्य नसल्यास त्यावर पाण्याचा फवारा मारुन थंड करावे. |
| **लक्षणे** | **घ्यावयाची काळजी** | **प्रथमोपचार** |
| त्वचा-त्वचादाहक, डोळे-डोळ्यांच्या ग्रंथीस धोकादायक श्वसनसंस्था-श्वसनास दाहक व अडथळा येणे, खोकला येणे. | गमबुट, पी.व्ही.सी. हातमोजे वापरा. शीर मुखवटा (हेड मास्क) वापरा. गळती थांबवा, श्वसन उपकरण किंवा एअर लाईन्स श्वसन उपकरण वापरा. | तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा. |

| विल्हेवाट | साठा |
|---|---|
| सांडलेले रासायन सोडा ॲश वैगरे वापरुन उदासीन करा किंवा सांडलेल्या जागी भरपूर पाण्याचा वापर करा व त्याचा निचरा करा. | कंटेनर्स ठेवण्याकरिता थंडगार, कोरड्या, हवेशीर व स्वतंत्र वेगळ्या जागेचा वापर करावा. |

**इतर माहिती**

१) क्लोरीन गळती शोधण्याकरिता द्रवरुप अमोनियामध्ये बुडविलेल्या काडीचा वापर जेणेकरुन क्लोरीनशी अभिक्रिया होऊन निर्माण होणाऱ्या पांढऱ्या धुरोन गळतीचे ठिकाण कळेल.
२) गळतीच्या ठिकाणापासून वाऱ्याच्या विरुध्द दिशेला अथवा काटकोनात निघून जावे.
३) शरीराच्या कुठल्याही भागाशी द्रवरुप क्लोरीनचा संपर्क होऊ नये याची काळजी घ्या.
४) श्वसनाचे आजार असणाऱ्या लोकांनी क्लोरीनच्या संपर्कापासून दूर रहावे.



Five days Workshop on Safety & Health for Ship Building & Ship Repair Industry jointly organized by NSC-MC & CLI, Safety Division, Mumbai on 31st August – 4th September 2009




Shri D. L. Maskikar, Vice-Chairman NSC-MC presenting Certificate to participant of Five days Workshop on Safety & Health for Ship Building & Ship Repair Industry



# Where there's energy, there's HP

**Powering marine engines, propelling airplanes, energizing industries, mechanizing agriculture, igniting stoves, lighting lanterns ... HP is synonymous with energy in India.**

For the last 30 years and more, Hindustan Petroleum has meant different things to different people. For some it represents an abundant supply of Petrol & Diesel. For others it stands for the easy availability of LPG and lubricants. Thousands of others see in it an inexhaustible reservoir of Kerosene and other petroleum products for meeting their energy needs. For all of them HP signifies an ever-radiant source of energy. Energy that is making a big difference to millions of lives. In the new millennium HP is all set to unveil an exciting new phase in its growth. Diversifying into Oil Exploration and Production, Power Generation, Renewable Energy ventures and much more. Confident of creating a future full of energy.



*Future full of energy*

• PETROL • DIESEL • LPG • KEROSENE • AVIATION FUEL • NAPHTHA • FURNACE OIL • BITUMEN • LOW SULPHUR HEAVY STOCK • LUBES & GREASES • SOLVENTS • INDUSTRIAL SPECIALITIES





10th AGM of NSC-MC held on Friday the 19th September 2009 at West End Hotel, Mumbai from left Shri P. R. Masurkar, Hon. Secretary, Shri A. R. Doshi, Chairman, Shri D. L. Maskikar, Vice-Chairman, Shri A. A. Raichur, Vice-Chairman & Members of the NSC-MC attending 10th AGM

## काय झालं... काय चुकलं... कि प्रारब्ध?

जेमतेम वयाच्या अठराव्याच वर्षी सोमनाथचे त्याच्या वृद्ध आईबापांनी लग्न लावून दिले. शिक्षण नाही तरीही घरात सुन हवी होती. पुढचा विचार आपोआप होतो. एका वर्षाने सोमनाथला मुलगी होते. त्या मुलीच्या पायगुणाने त्याला एका कंत्राटदाराकडे नोकरी लागली. सोमनाथ मुळात कष्टाळू व हुशार. कारखान्यातील उंच उंच छपरावर पत्रे बसविण्यात तो एकदम वाकबगार बनला. सर्कशीतल्या कलावंताप्रमाणे भरभरा वर चढुन जायचे अन पत्रे बसवायचे म्हणजे त्याच्या हातचा मळ. त्याच्या याच कौशल्यामुळे कंत्राटदाराला त्याच कारखान्यातील अजुनही इतरही कामे मिळाली व सोमनाथला जास्त पैसे मिळू लागले. अशी ३ ते ४ वर्ष भरभराटीने गेली.

एके दिवस सोमनाथच्या कंत्राटदाराने त्याला नेहमी पेक्षा एक छोटसं काम दिल. काम तसे नेहमी पेक्षा कमी उंचीवर म्हणजे २० ते २५ फुटावर पत्र्यावर होते. तो ही त्याच्या मालकावर इतका खुश होता की मालकाने शब्द टाकायचा अन त्याने ते काम लगेच करायचे.

त्याही दिवशी सकाळीच सर्वांच्या अगोदर तो कामाला लागला. इतर लोकांची ती नाष्टा करण्याची वेळ. पण सोमनाथला मात्रा नाष्ट्यापेक्षा आपण मालकाला लवकरात लवकर काम पूर्ण करुन देण्याचे वेड. तो नाष्टा न करताच स्वतःच्या सुरक्षिततेसाठी लागणाऱ्या गोष्टीसाठी वेळ न दवडता कामाला लागला होता. त्याच्या दृष्टीने ते काम किरकोळ होते. त्याने वर जाऊन सांध्यातुन कामाच्या जागेवर जायला सुरुवात केली. नेहमीप्रमाणे शिताफीने तो सांध्यावर चालू लागला. पण तोच त्याचा तोल गेला आणि तो पत्र्यावर पडला. त्याच्या शरीराच्या वजनाने पत्रा तुटला आणि तो २० ते २२ फुटावरुन खाली फरशीवर पडला. त्या ठिकाणी नेहमी कोळशाच्या खाली गोण्या असायच्या पण काही दिवसापूर्वी त्या गोण्या तेथून हटवल्या होत्या. सोमनाथ पडला तो डोक्यावर, कपाळमोक्ष झाला. पडताना तो जोरात ओरडला व तो आवाज क्षणार्धातच शांत झाला. त्यानंतर आरडा ओरड धावपळ सुरु झाली. कंत्राटदाराच्या सुपरवायझरने व्यवस्थापन अधिकाऱ्याच्या मदतीने सोमनाथला ॲम्ब्युलंसने कंपनीच्या हॉस्पिटलमध्ये नेले. वैद्यकीय तपासणी झाली आणि सोमनाथ हे जग सोडुन गेला असा डॉक्टारांनी निर्णय दिला.

त्याच्या २ ते ३ वर्षाच्या मुलीला हे सगळे का रडताहेत हेच कळेना. त्या मुलीचे लहानपणातच पितृछत्र हरपले होते. त्याच्या पत्नीवर ऐन तारुण्यात वैधव्याचे न झेपणारे संकट डोक्यावर कोसळले होते. त्याची मात्रोश्री तर बेशुद्धच झाली कारण तीचा म्हातारपणाचा आधार गेला होता. त्याच्या बरोबर कंत्राटदाराचे इतर त्याचे साथीदार कामगार कारखान्यातील कामगार व कर्मचारी दोन तीन दिवस फार हळहळले चर्चा झाली. कोणी म्हणत की त्याच्या प्रारब्धातच लिहुन ठेवलं होत. कोणी म्हणत त्या दिवशी यमराजाच्या यादीत त्याच नावच होत. त्याला कोण काय करणार, परमेश्वराचीच इच्छा. एरवी ५० ते ६० फुट उंचीवर अगदी सहजगत्या काम करणारा सोमनाथ २० फुटावरून पडतोच कसा? प्रारब्ध नाही तर दुसर काय!!!

मित्रांनो खरचं, प्रारब्ध कि काय चुकलं!!!

सत्य कथेवर आधारीत शब्दांकन

**श्री. बी. बी. देठे**

सहप्रबंधक - क्लीन मार्क फार्मास्युटीकल्स

मोबाईल: ९१२०६९०२१६



188th Training Course in Industrial Safety in collaboration with Central Labour Institute – Safety Division Mumbai on 15th-17th July 2009

## पुरे अनाचार !

पुरे अनाचार आता धरेवर
हा वाढताहे उष्मा भयंकर ।।१।।

निसर्ग गेला कुठे पवित्र?
फुकाच मिरवे मानव सर्वत्र ।।२।।

देवाने दिधली मानव विपूल भूमि
सहकार भावे पिकऊ ती नामी ।।३।।

घरे बांधली ही तरी कॉंक्रिटची
तरी काय म्हणता प्रगती हिलाची ।।४।।

कुण्या वाटे गेली कुठे बा ती गेली?
हरित वस्त्रे लेऊन भूमाय अपुली ।।५।।

मी नित्य जाई सागर किनारी
घेण्या हवेची ताजी खुमारी ।।६।।

कदापी न लाभे मज शुध्द वारा
धुरा धुक्याचाच मी सोशी मारा ।।७।।

मी होऊ कैसा तगडा जवान?
कैसे हे होईल निकोप मन? ।।८।।

कसे तोंड देऊ सुनामिला या
महापुराला नि दुष्काळ ऋतुला? ।।९।।

कसा देह साही रुधिरा विषारी
सी.ओ.टु., क्लोरीन, मिथेनधारी? ।।१०।।

हवा, नीर आणि सुर्यप्रकाश
प्रदूषणाने यांचाही नाश ।।११।।

जागा जनांनो वेळीच जागा
निसर्ग-नियमांस स्मरुन वागा ।।१२।।

येईल काबूत वर्धिष्णु उष्मा
जगात होईल पुन्हा करिष्मा ।।१३।।

होईल धरती हिरवी नि गरती
यालाच म्हणती ती सत्य प्रगती ।।१४।।

**जयसिंह सोळंकी**

कार्यकारी समिती सभासद

# SEMINAR ON

# "Global Climate Changes-Role of Industries-Challenges & Opportunities"

The National Safety Council-Maharashtra Chapter, for the last 13 years has been organizing Seminars on various current relevant topics which have main concern for Safety in Industry. This year we have selected "Global Climate Changes - Role of Industries - Challenges & Opportunities" as the Theme for the Seminar at the 13th Regulating Agencies and Safety Professionals Meet held on Saturday, the 19th September, 2009 at West End Hotel, Mumbai. This Seminar has provided the officials from Regulating Agencies and Professionals from industries, a common platform to acquaint them with the progress made in the field of Environmental Issues, current and future threat etc. for their self-development and development of their functions.

The Seminar was inaugurated by Dr. A.K. Chakrabarti, Dy. Director-General Factory Advice Service & Labour Institutes, Government of India, Ministry of Labour & Employment, Mumbai.

The Seminar was attended by 101 delegates from industries situated in Maharashtra State.






Inauguration function of Seminar on Global Climate Changes – Role of Industry – Challenges & Opportunities organized by NSC-MC, From right Shri A. A. Raichur, Vice-Chairman, Shri D. L. Maskikar, Vice-Chairman, Dr. A. K. Charakbarti, Dy. Director FASLI, Shir P. R. Masurkar, Hon. Secretary & Shri A. R. Doshi, Chiarman addressing the seminar. Participants from all over Maharashtra attending the Seminar.




First Technical session from left Shri C. Kalia,from Ernst & Young Pvt. Ltd. Mumbai, Shri S. V. Kale, Rapporteur, Shri A. A. Raichur, Dy. GM (SHE Corporate Office HPCL)



Second Technical session from Left Shri R. Balani from PCRA, Mumbai, Shri D. L. Maskikar, Rapporteur, Shri. Aattarwala from FURAAT EARTH

# TOPICS COVERED IN THE SEMINAR

'Global Warming Overview' – Shri. A.A.Raichur Deputy General Manager (S.H.E. Corporate Office) Hindusthan Petroleum Corporation Ltd, Mumbai has explained in detail 'What is global warming' and discharge of green house gases like carbon dioxide, methane, nitrous oxide, smoke from industry, boilers, furnaces and vehicles which causes global warming.

'Kyoto Protocol, CDM Projects Development Process & Carbon Trading' - Shri. Chaitanya Kalia, Partner – Climate Changes & Sustainability Services & Risk Advisory Services, Ernst & Young Pvt. Ltd. Mumbai has focused on the response to the global warming, the Kyoto Protocol, a treaty which strives to lower worldwide Greenhouse Gases (carbon dioxide, methane etc.) emissions has come in to effect. He also explained about an incentive scheme known as Carbon Credit & the Clean Development Mechanism (CDM) concept.

'Energy Saving Scheme Leading to Reduction of Green House Gases' – Shri. R. Balani, Asst. Director, Petroleum Conservation Research Development Association (PCRA), Mumbai,

'Rain Water Harvesting' – Shri. Aattarwala from FURAAT EARTH has explained various Rain Water Harvesting projects executed by his company.

### “‘महाराष्ट्र टाइम्स” ने घेतलेली दखल

**सुरक्षिततेवर परिसंवाद**

राष्ट्रीय सुरक्षा परिषदेतर्फे 'पृथ्वीवरील वातावरणातील बदल - उद्योगांचा सहभाग, आव्हान आणि संधी' या विषयावर एक दिवसाच्या परिसंवादाचे आयोजन केले होते. यात औद्योगिक क्षेत्रातील व्यावसायिकांना पृथ्वीवरील वातावरणात होणाऱ्या बदलांबाबत जागतिक पातळीवर होत असलेल्या घडामोडींची आणि संशोधनाची माहिती देण्यात आली. कारखाना सल्ला सेवा आणि श्रम संस्थान महानिर्देशालयाचे उपमहासंचालक डॉ. ए. के. चक्रवर्ती यांनी या परिसंवादाचे उद्घाटन केले.

## NSC-MC UNDERTAKES

Safety Audits, Energy Conservation, Inhouse Training Programmes & other Safety related assignments.

Please write to:

**The Hon. Secretary**

**NATIONAL SAFETY COUNCIL - MAHARASHTRA CHAPTER**

5/48, Tardeo A.C. Market Bldg., Tardeo Road, Mumbai - 400034.

Telefax: 022-2352 3042 Email: nscmc@mtnl.net.in

## ARTICLES & SUGGESTIONS

Members are requested to forward their articles in Marathi, Hindi & English on the theme connected with health, safety and environment for publishing the same in the forthcoming issue of the NSC-MC newsletter, at least 30 days in advance of previous month of issue.

**Advertise in 'Mahasurksha Patrika' and derive BIG benefits**

(Mahasuraksha Patrika reaches over 2000 members from all of life all over Maharashtra)

**ADVERTISEMENT TARIFF**

| Position | Single Insertion | Position | Single Insertion |
|---|---|---|---|
| Full Page | Rs.5,000/- | Half Page | Rs.3,000/- |
| Quarter Page | Rs.1,500/- | | |

Note: Positive / artwork or CD accepted upto 15th day of previous month of issue.




**EDITORIAL BOARD: Mr. D.L. Maskikar** (Chief Editor), **Mr. A.A. Raichur, Mr. P.R. Masurkar, Mr. J.A. Solanki, Mr. M. Kant.**
Price Rs.20/- for non members. Edited and Published by: D.L.Maskikar, Vice Chairman on behalf of National Safety Council-Maharashtra Chapter, 5/48, Tardeo A.C. Market Building, Tardeo Raod, Mumbai 400 034. Telefax: 022-2352 3042, Email: nscmc@mtnl.net.in and Printed by GOPALE TRADERS, 13/21, Mapla House, #15, Chana Street, Fort, Mumbai - 400 001. *The views expressed by the authors of the articles published are their own and NSC-MC does not assume any responsibility for the same.*

NUCLEAR SAFETY SPECIALIST

# SAFETY UMBRELLA

A Division of Safety Services, Mumbai

&

# SAFETY SERVICES

ALL BRANDED PPE'S UNDER ONE ROOF

Add: A/5, RAJNIKETAN BUILDING, OPP. MAHINDRA GARDEN, S.V.ROAD, GOREGAON (W), MUMBAI- 400 062
Tel : 022-2872 26 27 / 2876 45 42, Fax : 022-2872 48 31 Email Id: safetyumbrella@gmail.com / safetybom@vsnl.net
Web : www.dandsafety.com

## DISTRIBUTORSHIP OF THE FOLLOWING COMPANIES AND PRODUCTS:

**PIERCAN S.A.S.** (FRANCE):
ISOLATOR GLOVES & BOOTING (FOR INDIA)

**SPERIAN PROTECTION HONG KONG LTD. (HONG KONG)**
PERSONAL PROTECTIVE EQUIPMENTS

**RAE SYSTEMS (UAE):**
RADIATION DETECTION SOLUTION (FOR INDIA)

**NITREX Sdn bhd** (MALAYSIA):
HAND PROTECTION (FOR INDIA)

**AERO CLUB** (INDIA) :
MANUFACTURE OF WOODLAND SAFETY SHOES & CASUAL SHOES

**SPERIAN CLOTHING LTD.** (FORMERLY DELTA CLOTHING LTD.) (FRANCE)
(NUCLEAR RESPIRATORY & TAPES SPECIALIST) (FOR INDIA)

**BELLAIR** (FRANCE)
BREATHING AIR SOLUTIONS (FOR INDIA)